
आजचा दिनविशेष



१८९३ : स्वामी विवेकानंदांनी जागतिक सर्व धर्म परिषदेसमोर त्यांचे प्रसिद्ध भाषण दिले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | गुरुवार ११ सप्टेंबर २०२५ | अंक २६२ | पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# जरांगे पाटलांचा मोठा विजय, पाच दिवसातच सरकारने घेतला मोठा निर्णय; मराठा समाजात प्रचंड जल्लोष

**मनोज जरांगे यांच्या मुंबई धडक मोर्चाचा मोठा परिणाम झालेला दिसतो. नशिबाचा कौल जणू त्यांच्या बाजूने लागत असल्याचे चित्र आहे**

**मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत अक्षदा पडल्यानंतर एका पाठोपाठ एक मोठ्या निर्णयाची जंत्रीच समोर येत आहे.**

**मराठा आंदोलनात एकुण 254 जणांचा मृत्यु झाला होता. यातील 96 मृतांच्या नातेवाईकांना काल 9 कोटी 60 लाख रुपये वर्ग करण्यात आलेत.**

मुंबईत ठाण मांडल्यापासून मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला मोठे यश आल्याचे दिसून येत आहे. हैदराबाद आणि सातार गॅझेट पदरात पाडून घेतल्यानंतर मनोज जरांगे यांच्या लढ्याला अजून मोठे यश आले आहे. आज सकाळीच मराठा आंदोलकांवरील गुन्हे नोंद मागे घेण्यासाठी प्रक्रिया सुरू झाल्याची आनंदवार्ता येऊन धडकली नाही तोच आता अजून एक मोठी वार्ता समोर आली आहे. आंदोलकांची मोठी मागणी सरकारने मान्य केल्याने राज्य सरकार आंदोलकांच्या बाजूने असल्याचे दिसून येत आहे.



## आंदोलकांच्या कुटुंबियांना 9 कोटींची आर्थिक मदत

## आंदोलकांवरील गुन्हे महिनाअखेर मागे

मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज सकाळी महत्त्वपूर्ण माहिती दिली. मराठा आंदोलनावेळी ज्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. त्यांच्यावरील गुन्हे या महिनाअखेर, सप्टेंबर अखेर मागे घेण्यात येतील अशी माहिती विखे पाटील यांनी दिली. प्रत्येक सोमवारी संबंधित जिल्हाधिकारी गुन्ह्याचा आढावा घेतील आणि समितीपुढे त्याविषयीचा प्रस्ताव सादर करतील. मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरु झाल्याचे सूतोवाच विखेंनी केले.



## आंदोलनात एकुण 254 जणांचा मृत्यु झाला होता.

मराठा आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना 9 कोटी 60 लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत. ही रक्कम त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात आले आहेत. मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मराठा आंदोलनातील एक महत्वाची मागणी पुर्ण झाली आहे. मराठा आंदोलनात एकुण 254 जणांचा मृत्यु झाला होता. यातील 96 मृतांच्या नातेवाईकांना काल 9 कोटी 60 लाख रुपये वर्ग करण्यात आलेत. तर याआधी 158 मृतांच्या नातेवाईकांना 10 लाख रुपया प्रमाणे मदत करण्यात आली होती. त्यामुळे आतापर्यंत मराठा आंदोलनात मृत्यू झालेल्या सर्वांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यात आली आहे. या आंदोलनाला आलेलं हे मोठं यश मानण्यात येत आहे. आता हैदराबाद आणि सातारा गॅझेटनुसार जेव्हा मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र वाटप सुरू होईल. तेव्हा मनोज जरांगे आणि त्यांचे सहकारी खऱ्या अर्थाने गुलाल उधळतील अशी समाजाची भावना आहे.

## आष्टी तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा बक्षिस वितरण समारंभ



कडा (प्रतिनिधी) बाजीज क्रीडा मंडळ वाघळुज व श्री संत कैकाडी महाराज माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय वाघळुज यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा सन २०२५-२६ च्या १७ वर्ष वयोगटातील मुले यांचा बक्षिस वितरण समारंभ कार्यक्रम दिनांक १३ सप्टेंबर २०२५ शनिवार रोजी सायंकाळी ५:३० साडेपाच वाजता श्री संत कैकाडी महाराज माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय वाघळुज ता.आष्टी या ठिकाणी आयोजक संतोष श्रीधर गुंड शेतकरी संघटना तालुकाध्यक्ष यांनी आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून धैर्यशील हनुमंत थोरवे लोकमान्य शिक्षण संस्थाचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत. हे बक्षिस वितरण युवा नेते जयदत्त (भैय्या) धस, युवा नेते यश (भैय्या) आजबे,युवा नेते अजय (दादा) धोंडे, राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष ऋषिकेश दरेकर, तेजवार्ताचे संपादक बबलूभाई सय्यद,पत्रकार अनिरुद्ध धर्माधिकारी,आज मराठीचे संपादक अविशांत कुमकर,पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते रहेमान सय्यद यांच्या हस्ते होणार आहे. तरी या बक्षिस वितरण समारंभाच्या कार्यक्रमाला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक संतोष श्रीधर गुंड यांनी केले आहे.

## दुष्काळग्रस्त बीडसाठी विशेष निधी अन् मंजूरी द्या

### खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांची भेट घेवून केली मागणी

बीड: बीड जिल्हा दुष्काळग्रस्त आहे. पायाभूत सोयी-सुविधा पण कमी आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी आणि मंजुरी मिळावी, अशी मागणी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय ऊर्जा आणि गृहनिर्माण तथा शहरी व्यवहार मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दि.१० रोजी खा.सोनवणे यांनी मुंबई येथे मंत्री खट्टर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. बीड जिल्ह्यात विविध विकास योजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय मंत्री खट्टर यांना दिलल्या निवेदनात म्हटले आहे, ग्रामीण भागात नवी वीज सबस्टेशन, ट्रान्सफॉर्मर गावागावात स्थिर वीजपुरवठा व्हावा म्हणून ही गरज आहे. शेतकऱ्यांना सौर पंप (पीएम-कुसुम योजना) शेतीसाठी पाणीपुरवठा सोपा होईल. शहरी भागात स्मार्ट मीटर व भूमिगत केबल वीज चोरी थांबेल आणि सुरक्षित वितरण होईल. सौर-पवन ऊर्जेचे प्रकल्प जिल्ह्याला

### सभागृहातही खा.सोनवणेंचाच आवाज

खा.बजरंग सोनवणे हे ग्राऊंड पातळीवरून आलेले नेतृत्व आहे. यामुळे ग्रामीण भागात काय आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना आहे. विशेष म्हणजे, याच कारणाने ते दिल्लीतील सभागृहात बीडसह मराठवाड्याचे देखील प्रश्न मांडत असतात. यामुळे संसदेत महाराष्ट्रातून सर्वाकि प्रश्न मांडणारे खासदार म्हणून सोनवणे यांच्याकडे पाहिले जात आहे.



हरित ऊर्जा उत्पादनाचं नवं केंद्र बनवता येईल. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) शहरातल्या गरीब व मध्यमवर्गीयांना परवडणारी घरं उपलब्ध होतील. अमृत २.० मिशन अंतर्गत पाणीपुरवठा, ड्रेनेज व स्वच्छता योजना झ्र स्वच्छ वातावरणामुळे आजारपण कमी होईल. बसस्थानक, रस्ते, उद्यानांचं आधुनिकीकरण प्रवास व दैनंदिन सोयीसुविधा सुधारतील. ई-वाहन चार्जिंग हब बीड जिल्हा ई-वाहन वापरासाठी पुढारलेला ठरेल. या प्रकल्पांमुळे बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल आणि जनतेच्या जीवनमानात मोठा फरक पडेल, असा विश्वासही खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, खा.सोनवणे हे सर्वांगिन विकासासाठी प्रयत्न करत असून केंद्रीय मंत्र्यांकडे ते बीड जिल्ह्यातील विविध प्रश्न सातत्याने मांडत आहेत. खा.सोनवणे यांनी अनेक मंत्र्यांच्या भेटी घेवून बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवलेला आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार ११ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## घरातील बागेत पालक भाजीची लागवड कशी कराल? जाणून घ्या 'ही' संपूर्ण प्रोसेस



आजकाल बाजारातून मिळणाऱ्या भाज्या ताज्या दिसाव्यात यासाठी त्यावर केमिकलचा अधिक वापर केला जातो. त्यामुळे पालक घरी आणल्यानंतर एक ते दोन दिवसातच शिजवावी लागते, अन्यथा पाने कुजण्यास सुरूवात होते आणि भाजीतील ताजेपणा कमी होतो. जर तुम्हीला ताजी व सेंद्रिय भाजी सेवन करायची असेल तर घरी तुम्ही पालक भाजीची लागवड करू शकता. कारणघरातील बागकाम किंवा स्वयंपाकघरातील बागकाम बहुतेक लोकांना आवडते आणि ते फायदेशीर देखील आहे. याच्या मदतीने तुम्ही घरी सेंद्रिय फळे आणि भाज्या लागवड करू शकता आणि त्यामुळे तुम्हाला आतून आनंद मिळतो, ज्यामुळे ताण कमी होतो. काही भाज्या, फळे आणि फुले घराच्या अंगणात, टेरेसमध्ये किंवा बाल्कनीमध्ये सहज वाढवता येतात. यामुळे तुम्हाला ताज्या आणि रसायनमुक्त गोष्टी खायला मिळतातच, शिवाय घराचे वातावरणही चांगले राहते. हिरव्या पालेभाज्या खूप आरोग्यदायी असतात आणि तुम्ही त्या घरी सहज वाढवू शकता. या लेखात आपण पालक भाजी कशी लागवड करावी हे जाणून घेणार आहोत. पालकमध्ये अनेक पोषक तत्वांचा खजिना आहे आणि तुम्ही पालक भाजी घरी लागवड केली तर त्यांचे आणखी फायदे तुमच्या आरोग्याला मिळतात. कारण त्यात कोणतेही रसायन वापरले जात नाही. तुम्ही लहान जागेत पालक सहजपणे वाढवू शकता आणि त्याची काळजी घेणे देखील फार कठीण नाही. चला तर मग पालकाचे फायदे, पोषक तत्वे आणि ते वाढवण्याची पद्धत टप्प्याटप्प्याने जाणून घेऊया.पालकामध्ये अनेक पोषक घटक असतातहेल्थ लाईनच्या मते, पालकामध्ये 91 टक्के पाणी असते. याशिवाय, ते प्रथिने, कार्ब्स, फायबर, फॉलिक ॲसिड, लोह, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन के१ आणि कॅल्शियमचा स्रोत देखील आहे. याशिवाय, त्यात बी6 आणि बी9 देखील कमी प्रमाणात असते.जीवनसत्त्वे आणि खनिजांव्यतिरिक्त, पालकामध्ये ल्युटीन, नायट्रेट, झेक्सॅन्थिन सारखे वनस्पती संयुगे देखील असतात, म्हणून त्याचे सेवन तुमच्या आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर आहे. मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनी त्यांच्या आहारात पालकाचा समावेश करावा.पालक खाण्याचे काय फायदे आहेत?पालक ही अनेक आवश्यक पोषक तत्वांनी समृद्ध असलेली हिरवी भाजी आहे, म्हणून पालक भाजी तुमच्या आहारात समाविष्ट केल्याने अनेक आरोग्य फायदे आपल्या शरीराला मिळतात. पालकाचे सेवन केल्याने ऑक्सिडेटिव्ह ताण कमी होतो. रक्तातील साखर नियंत्रणात राहते, वजन नियंत्रण, जळजळ कमी करणे यासह अनेक प्रकारे ते फायदेशीर आहे. पालकमध्ये आढळणारे व्हिटॅमिन ए, झेक्सॅन्थिन आणि ल्युटीन तुमचे डोळे निरोगी ठेवतात, तर व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्यात आणि त्वचा निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. यात असलेले लोह लाल रक्तपेशी वाढवण्यास मदत करते.

## जिल्हा प्रशासनाचा वृक्षलागवडीचा आणखी एक "इव्हेंट" – जिल्हाधिका-यांचे प्रवचन कौतुकास्पद, परंतु "तुती" वृक्षलागवडीबाबत भाष्य न केल्याने पर्यावरणप्रेमी निराश – डॉ. गणेश ढवळे

बीड (दि. १०) : बीड जिल्हा प्रशासनाकडून वृक्षलागवडीचे "इव्हेंट" करण्याची परंपरा कायम ठेवली जात असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. यापूर्वीचे जिल्हाधिकारी राधा बिनोद शर्मा यांनी बिंदुसरा नदीकिनारी १६ किलोमीटर परिसरात ५ हजार बांबू रोपांची लागवड केल्याचा इव्हेंट करून स्वतःची पाठ थोपटून घेतली होती. मात्र काही महिन्यांतच तेथे खड्डे उरले, झाडे जगवली गेली नाहीत. विवेक जॉन्सन यांनी या परंपरेला चालना देत एकाच दिवसात तब्बल ३० लाख वृक्षलागवडीचा इव्हेंट करून इंडियन बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये आपले नाव नोंदवून घेतले. यानिमित्ताने पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कारही झाला.

जिल्हाधिका-यांचे प्रवचन, पण "तुती"वर मौन...

दि. ९ रोजी वृक्षारोपण उपक्रमाचे उद्घाटन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले. झाडांमुळे प्रदूषण कमी होणे, उष्णता नियंत्रित राहणे, नागरिकांना शुद्ध हवा मिळणे, जैवविविधतेला चालना मिळणे अशा विविध फायद्यांवर त्यांनी भाष्य केले. प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली



पाहिजे असेही आवाहन केले.

### शासकीय कार्यालयातील वृक्षतोडीकडे दुर्लक्ष

दरम्यान, बीडचे जिल्हाधिकारी वृक्षलागवडीबाबत पुढाकार घेत असताना जिल्हा कारागृह आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील साग वृक्षतोडीच्या प्रकरणात मात्र ते मौन बाळगून असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे. वारंवार निवेदने व आंदोलने होऊनही या संदर्भात कारवाई न झाल्याने पर्यावरण कार्यकर्त्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

मात्र यावेळी "तुती" वृक्षलागवडीबाबत कोणतेही भाष्य झाले नाही. तुतीची पाने रेशीम किड्यांसाठी खाद्य म्हणून वापरता येतात, परंतु ही लागवड नेमकी किती वर्ष टिकवायची? ३ वर्षांनंतर ती उपटून काढण्यास परवानगी लागणार का? तुतीला खरंच वृक्षलागवडीचा दर्जा मिळतो का? असे अनेक प्रश्न अनुत्तरितच राहिल्याने पर्यावरणप्रेमींमध्ये निराशा पसरली. पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी जिल्हाधिका-यांचा तुतीच्या झाडाने सत्कार करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे यांनी विनोदी शैलीत केली आहे.

## कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या औरंगाबाद विभागीय उपाध्यक्षपदी शेख जलिल यांची निवड


बीड दिनांक 10/ 9/ 2025(प्रतिनिधी) पंचायत समीती बीड येथे आयोजित कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या एका छोटेखानी कार्यक्रमात शेख जलील यांची औरंगाबाद विभागीय उपाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली . याबाबत अधिकृत असे की कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघांच्या वतीने अधिकारी कर्मचारी सत्कार कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य अध्यक्ष अनिल जाधवर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून , विस्तार अधिकारी सिध्देश्वर माटे,प्रकाश अहिरे राज्य उपाध्यक्ष,रवी सुतार राज्य कार्याध्यक्ष,भगीरथ मस्के राज्य उपाध्यक्ष , विभाग अध्यक्ष डि एस वाघमारे , बाळू अहिरे, मचिंद्र राख जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब हंगे हे होते .यावेळी नुकताच आदर्श अधिकारी म्हणून पुरस्कार मिळालेले गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांचा यावेळी संघाच्या वतीने



सत्कार करण्यात आला तसेच नुकतेच सेवानिवृत्त झालेले विस्तार अधिकारी राजेंद्र खेडकर यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला . यावेळी शेख जलील यांची संघटनेच्या विभागीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांना आदेश देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला . शेख जलील हे अत्यंत स्पस्ट वक्ते , झुंजार व लढाऊ व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जातात जातात ते एक तरुण तडफदार असे नेतृत्व असून त्यांची निवड झाल्यामुळे सर्वांनी समाधान व्यक्त केले .बैठकीचे सूत्रसंचालन सचिव राहुल सुपेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मन्यार हकीम यांनी केले . त्यांचे अभिनंदनराज्याध्यक्ष अनिल जाधवर राज्य सचिव सुभाष जगताप राज्यकार्य अध्यक्ष रवी सुतार उपाध्यक्ष प्रकाश अहिरे ,मच्छिंद्र राख, भगीरथ मस्के,भागवत सोनवने, जिल्हाध्यक्ष . भाऊसाहेब हंगे ,राहुल सुपेकर,मनियार हकीम ,भाऊसाहेब मिसाळ, संजय दराडे , सोमनाथ तांदळे , मचिंद्र राख , परमेश्वर हंगे ,गव्हाणे सर ,कल्याण शिरसागर, यांनी केले आहे .

## पाटोदा तालुक्यात प्रश्न अनेक, सामाजिक कार्यकर्त्यांचे इरादेही नेक; मात्र सर्वसामान्य जनताच फेक असल्याने लढायचं कुणासाठी?

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यात असंख्य प्रश्न आहेत. त्यामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई, रस्त्यांची दयनीय अवस्था, शेतकऱ्यांचे हाल, बेरोजगारी, आरोग्याची बिकट परिस्थिती पण सर्वसामान्य जनता मात्र गप्प बसलेली आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या जनतेला या प्रश्नांचा रोज सामना करावा लागतो, तीच जनता बोलायला किंवा उभे राहायला तयार नाही सामाजिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षाचे नेते प्रश्नांसाठी सतत आवाज उठवत शासन- प्रशासनाला धडक देत आहे. पण जनतेचा पाठिंबा कुठे आहे? गावोगावी लोक फक्त चर्चा करतात, पण कृतीत मात्र शून्य! भीतीपोटी किंवा स्वार्थापोटी जनता मौन बाळगते आणि निवडणुकांच्या वेळी पुन्हा त्याच लोकांना निवडून देते, ज्यांच्या काळात हे प्रश्न निर्माण झाले.मग प्रश्न उपस्थित होतो "लढायचं कुणासाठी? जे स्वतःच्या हक्कासाठीही उभं राहात नाहीत, त्यांच्यासाठी कार्यकर्त्यांनी किती लढायचं?"पाटोद्यात प्रश्नांचे डोंगर आहेत, कार्यकर्त्यांचे इरादे प्रामाणिक आहेत, पण जनता जर अशीच निष्क्रिय राहिली, तर पाटोदा तालुक्याच्या विकासाला आणखी किती वर्षे अन्याय सहन करत गप्प बसावे लागेल, हा असा मोठा प्रश्न आहे!



## बंजारा एसटी आरक्षणासाठी पहिला बळी

बीड,- हैदराबाद गॅझेटनुसार बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी बीड जिल्हास्तरीय बैठक सोमवारी पार पडली. यावेळी हजारोंच्या संख्येने समाज बांधव बीड शहरात दाखल झाले होते. बैठक संपून घरी ओरडत असतांना रस्त्यात अपघात झाला. यात उपचारदरम्यान प्राणज्योत मावळली. हैदराबाद गॅझेटमध्ये बंजारा समाजाची नोंद आहे. मराठा समाजातील कुणबी नोंदी तपासणीसाठी शासनाकडून गॅझेट लागू करण्यात आले. ते बंजारा समाजाला पण लागू करत एसटीप्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे. अशी मागणी केली जात आहे.बाळराजे चव्हाण रा. भेंडटाकळी तांडा ता.गेवराई जि बीड हा तरुण नेहमी समाजाच्या कुठल्या पण बैठकीला तसेच समाजाच्या आरक्षण लढाईत सक्रिय सहभाग असायचा. समाजासाठी यामागीलघेण्यात आलेल्या आंदोलन, मोर्चा मध्ये पुढे राहून काम



करताना दिसायचा. सोमवारच्या बैठकीतही सक्रिय सहभाग दाखविला होता. मात्र बैठकीनंतर दुचाकीवरून गावाकडे परतत असतांना रस्त्यात त्याचा अपघात झाला. यात तो गंभीर जखमी झाला उपचारासाठी नातेवाईक यांच्याकडून संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र दोन दिवसांच्या उपचारानंतर त्याची प्राणज्योत मावळली. याबद्दल समाज बांधकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. मोठा सहभाग घेतला

# नादच नाय करायचा: बायकोला सोडवण्यासाठी पठ्ठ्या थेट वाघाशीच भिडला

चंद्रपूर जिल्ह्यात अनेकदा वाघाने नागरिकांवर किंवा पाळीव प्राण्यांवर हल्ला केल्याच्या बातम्या तुम्ही नक्कीच वाचल्या असतील. आताही जिल्ह्यात वाघांची दहशत कायम आहे. यामुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मूल तालुक्यातील सोमनाथ भागातून एक दुःखद घटना समोर आली आहे. या ठिकाणी वाघाच्या हल्ल्यात ५२ वर्षीय अन्नपूर्णा तुलसीराम बिलोने यांचा मृत्यू झाला आहे. समाजसेवक बाबा आमटे यांच्या प्रकल्पाच्या निवासी संकुलात ही घटना घडली आहे.बायकोला सोडवण्यासाठी पठ्ठ्या वाघाशी भिडलाया घटनेबाबत माहिती देताना रेंज फॉरेस्ट ऑफिसर रामचंद्र शेंडे यांनी सांगितले की, सकाळी ५ वाजता अन्नपूर्णा आणि तिचे पती तुलसीराम हे दररोजच्या कामात व्यस्त होते. त्यावेळी अचानक झुडपातून एक वाघ बाहेर आला आणि त्याने अन्नपूर्णा यांच्यावर हल्ला केला. यावेळी पत्नीला वाचवण्यासाठी तुलसीराम हे वाघाशी भिडले. हातात काठी घेऊन त्यांनी वाघावर हल्ला केला, मात्र पत्नीला वाघाच्या जबड्यातून सोडवण्यात त्यांना अपयश आले. तोपर्यंत आजूबाजूचे लोक जमा झाले. गर्दी जमल्यानंतर वाघ अन्नपूर्णा यांना सोडून जंगलाकडे पळाला, मात्र तोपर्यंत अन्नपूर्णा यांचा मृत्यू झाला होता. २०,००० रुपयांची सुरुवातीची मदतवन विभागाने मृत अन्नपूर्णा यांच्या कुटुंबाला २० हजार रुपयांची सुरुवातीची मदत दिली आहे. रेंज फॉरेस्ट ऑफिसर रामचंद्र शेंडे यांनी म्हटले की, या घटनेनंतर परिसरात





गस्त वाढवण्यात आली आहे, कॅमेरा ट्रॅप बसवण्यात आले आहेत. तसेच लोकांना सतर्क करण्यासाठी घोषणा दिल्या जात आहेत. या वाघाला पकडण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे परवानगी मागितली आहे. त्यानंतर वाघाला पकडले जाईल.वन विभागाची कारवाईचंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात नागरिकांचा जीव गेल्याची ही पहिली घटना नाही. याआधी ४ सप्टेंबर रोजी पाथरी गावात शेतात काम करणाऱ्या ७ वर्षीय पांडुरंग भिकाजी चाचणे यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. या घटनेनंतर वन विभागाने तातडीने कारवाई करत ७ सप्टेंबर रोजी हल्ला करणाऱ्या वाघिणीला शांत करून पिंजऱ्यात बंद केले होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ११ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## पीठ मळल्यानंतर किती तासात खराब होतं? तुम्हीही करतायत का दुर्लक्ष?



प्रत्येक घरात चपाती किंवा रोटी बनवण्यासाठी पीठ हे मळलंच जातं. पण कधी कधी वेळेअभावीच काही महिला पीठ मळून फ्रिजमध्ये ठेवतात. परंतु तुम्ही कधी विचार केला आहे का की हे पीठ किती दिवस ताजे राहू शकते? किंवा चुकीच्या पद्धतीने साठवले तर ते किती लवकर खराब होऊ शकते? मग ते मळून ठेवलेलं पीठ असो किंवा कोरडे. पीठाचा ताजेपणा केवळ अन्नाच्या चवीवरच परिणाम करत नाही तर संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्यावर देखील परिणाम करतो. त्यामुळे जाणून घेऊयात की पीठ किती तासात खराब होतं? पीठ हा ओलावा आणि उष्णतेचा सर्वात मोठा शत्रू आहे. जर तुम्ही ते जास्त वेळ भांड्यात न झाकता तसंच ठेवलं किंवा प्लास्टिकच्या पिशवीत ठेवलं तर त्यावर बुरशी, कीटक येऊ शकतात. त्यामुळे पीठ नेहमी हवाबंद डब्यात आणि थंड, तसेच कोरड्या जागी ठेवावं. पीठ खराब होण्यास किती वेळ लागतो? सामान्य गव्हाचे पीठ : उघडे ठेवल्यास 1 ते 2 आठवड्यात खराब होऊ लागते. मिश्र पीठ (मैदा + गहू + कोंडा) : 2 ते 3 आठवडे ताजे राहू शकते. मळलेलं पीठ : मळलेलं पीठ हे फ्रिजमध्ये ठेवलं तर ते 5 ते 6 तासांच्या आत वापरणे योग्य. तर मळल्यानंतर पीठ खोलीच्या तापमानात 2 ते 3 तासच सुरक्षित राहू शकते. बॅक्टेरिया वेगाने पसरतात: उन्हाळा आणि पावसाळ्यात त्याचे शेल्फ लाइफ आणखी कमी होते, कारण ओलावा आणि बॅक्टेरिया वेगाने पसरतात. खराब पीठ कसे ओळखावे? फक्त रंग पाहून पीठ खराब आहे की नाही हे ठरवता येत नाही. त्याची ही लक्षणे ओळखा, जसं की... विचित्र किंवा आंबट वास. लहान कीटक किंवा बुरशी दिसणे. चवीत बदल. पीठ चिकट किंवा गुठळ्यासारखे दिसणे जर यापैकी कोणतीही चिन्हे दिसली तर पीठ ताबडतोब फेकून द्या 1.पीठ जास्त वेळ ताजे कसे ठेवण्याचे 2.जुने पीठ संपल्याशिवाय किंवा संपत आल्याशिवाय नवीन पीठ खरेदी करून नका अन्यथा कोरडे पीठही खराब होऊ शकते. 3.ओल्या हातांनी किंवा भांड्यांनी कधीही पीठाला स्पर्श करू नका. 4.उन्हाळ्यात पीठ फ्रिजमध्ये किंवा थंड ठिकाणी ठेवा. 5.तुम्हाला शक्य असल्यास किंवा तुम्हाला चव आवडत असल्यास तुम्ही पीठ हलके भाजूनही घेऊ शकता खराब झालेल्या पीठाची रोटी किंवा चपाती खाल्ल्याने आरोग्यावर होणारे परिणाम खराब पिठापासून बनवलेल्या रोट्या किंवा पराठे खाल्ल्याने पोटदुखी, उलट्या, जुलाब आणि अन्नातून विषबाधा यासारख्या समस्या उद्भवू शकतात. मुले, वृद्ध आणि प्रतिकारशक्ती कमी असलेल्या लोकांना याचा जास्त त्रास होऊ शकतो. म्हणूनच पिठाच्या ताजेपणाबद्दल निष्काळजी राहू नये मायक्रोवेव्हमध्ये ठेवल्याने काय होते? काही लोकांना असे वाटते की पीठ मायक्रोवेव्हमध्ये ठेवून त्याचे शेल्फ लाइफ वाढवता येते, परंतु तज्ञांचे म्हणणे आहे की असे केल्याने पीठातील ओलावा आणखी वाढतो, ज्यामुळे ते लवकर खराब होऊ शकते.

# ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त बीड शहरात भव्य जुलूस AIMIM कडून शरबत, पाणी आणि लाडू वाटप

बीड : प्रतिनिधी ईद-ए-मिलादुन्नबीच्या पवित्र निमित्ताने बीड शहरात KGN ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य व दिव्य जुलुसने संपूर्ण शहर उत्साहाने झळाळून गेले. धार्मिक सद्भाव, सामाजिक ऐक्य आणि लोकहिताची भावना यांचा एकत्रित आविष्कार असलेल्या या कार्यक्रमात शहरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. जुलुस मार्गावर AIMIM पक्षाच्या वतीने शरबत, पाणी, कोल्ड्रिंक्स आणि लाडूचे वाटप करण्यात आले. यावेळी AIM-IM चे बीड जिल्हाध्यक्ष मा. ॲड. शेख शफीक भाऊ यांनी स्वतः उपस्थित राहून कार्यक्रमाची सुरुवात केली. नागरिकांना या सेवेमुळे मोठा दिलासा मिळाला असून, त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला विविध सामाजिक संघटनांचे मान्यवर उपस्थित होते. त्यांनी धार्मिक सौहार्द राखण्याबरोबरच समाजासाठी कार्यरत राहण्याचा संदेश दिला. जुलुसमध्ये सर्व वयोगटातील पुरुष, आणि युवक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. संपूर्ण मार्गावर आनंदी वातावरण असून, नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले. AIMIM चे जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ यांनी आपल्या भाषणात म्हटले की, "धार्मिक कार्यक्रम हे केवळ उत्सव नसून समाज एकत्र येण्याचा, परस्परांमध्ये प्रेम आणि सहकार्य वाढवण्याचा एक मार्ग आहे. प्रत्येकाने शांततेत आणि सौहार्द राखून कार्यक्रमात सहभाग घ्यावा." या कार्यक्रमामुळे बीड शहरात धार्मिक सलोखा आणि सामाजिक बांधिलकी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.





# शितल काळदाते जिल्हा स्तर आदर्श पुरस्काराने सन्मानित होणार

पुरस्कार प्रेरणा देतात आणि प्रेरणेन राष्ट्र मोठं होतं. या ऊक्तीप्रमाणे बीड जिल्हा पत्रकार संघ अत्यंत प्रेरणादायी कार्य करत आहेत. सन २०२५ मध्ये बीड जिल्हा पत्रकार संघाने बीड जिल्ह्यात उत्कृष्टरित्या कार्य करणाऱ्या शिक्षकांना जिल्हास्तर आदर्श शिक्षक पुरस्कार देत सन्मानित करण्याचे कार्य हाती घेतले आणि प्रसिद्धीपासून दूर राहिलेल्या मात्र कर्तव्याशी एकनिष्ठ असलेल्या शिक्षकांना एक ऊर्जा मिळाली. यापैकी एक शीतल मच्छिंद्र काळदाते सहशिक्षिका जि.प.प्रा.शा. दहिफळे वस्ती केंद्र माणूर तालुका शिरूर जि. बीड या शाळेत सन २०१८ पासून कार्यरत आहेत. शांत संयमी व उपक्रमशीलता या बाबीतून त्यांनी शाळेची गुणवत्ता वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. कोणतेही कार्य सकारात्मक दृष्टीने पाहण्याची त्यांची वृत्ती, छोट्या बालकांमध्ये उद्याचं राष्ट्र पाहण्याची भूमिका, एक शिक्षक म्हणून सामाजिक व राष्ट्र ीय जबाबदारीचे भान ठेवत आपले कार्य प्रामाणिकपणे पूर्ण करण्याचा प्रयत्न बीड जिल्हा पत्रकार संघाने हेरला, म्हणून यावर्षी दिल्या जाणाऱ्या बीड जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारांमध्ये त्यांचा समावेश करण्यात आला. खऱ्या अर्थाने कष्टाचं चीज झाले. प्रत्येक जण काम करत असतो पण त्याचा ऊहापोह नको अशी काहींची भावना असते मात्र बीड जिल्हा पत्रकार संघ नेमक अशीच माणसं हेरतो आणि त्यांना सन्मानित करत प्रेरणा देतो. यामुळे पत्रकार संघाचेही जिल्ह्यातून कौतुक होत आहे. शितल मच्छिंद्र काळदाते यांची सेवा रत्नागिरी जिल्ह्यात २००९ मध्ये सुरू झाली, असून तिथेही त्यांचं शैक्षणिक व सामाजिक कार्य उत्तम असल्याचे निदर्शनास आले. सन २०१८ पासून त्या आपल्या बीड जिल्ह्यात कार्यरत आहेत.



शैक्षणिक गुणवत्ता निर्माण करण्याबरोबरच

# ओबीसी विरोधी हैद्राबाद गॅझेट जीआर तत्काळ रद्द करा व ओबीसींच्या मागण्या मान्य करा

तालुक्यातील ओबीसी बांधव एकत्र येऊन उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदनाद्वारे हैद्राबाद गझेट जी. आर. रद्द करण्याची आणि ओबीसी बांधवांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी निवेदन केली आहे.निवेदनामध्ये ओबीसी विरोधी हैद्राबाद गझेट जी.आर. तात्काळ रद्द करा., ओबीसी विरोधी न्यायमूर्ती शिंदे समिती रद्द करा, न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने शोधलेल्या बोगस ५८ लाख कुणबी नोंदी रद्द करुन वितरीत केलेल्या कुणबी जात प्रमाणपत्रांची पारदर्शक चौकशी करा, महाराष्ट्र राज्याची जातिनिहाय जनगणना करुन ओबीसींची लोकसंख्या जाहीर करा,कुणबी जात प्रमाणपत्रांची पारदर्शक चौकशी करा. तामिळनाडू सरकारप्रमाणे आरक्षणाची ७५% मर्यादा वाढवून ओबीसी एस.सी. एस.टी. प्रवर्गाना लोकसंख्येप्रमाणे आरक्षणाची अंमलबजावणी करा., ओबीसींना संपूर्ण भारतात लोकसभा व विधानसभेत मतदार संघ आरक्षीत करा., मंडल आयोगाची ओबीसींना कायदेशिर अंमलबजावणी करुन सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक न्याय द्या., ओबीसींच्या लोकसंख्येप्रमाणे आर्थिक व शैक्षणिक तरतुद करा., ओबीसी विद्यार्थ्यांना महामंडळ निर्देशांकांप्रमाणे शिष्यवृत्ती देऊन प्रत्येक तालुकास्तरावर शासकिय वस्तीगृह सुरु करुन अत्याधुनिक सुविधा द्या., ओबीसी कम्रचाऱ्यांच्या विभागांतर्गत रिक्त पदे त्वरीत पदोन्नतीतून भरा., वरील मागण्या प्रमाणे ओबीसी विरोधी हैद्राबाद गॅडोट जी.आर. तात्काळ शासनाने रद्द करण्यात



यावा. नसता लोकशाही पध्दतीने अंदोलन करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी शासनावर वर राहिल असा निवेदनाद्वारे मागण्या केल्या आहेत यामध्ये प्रतिलीपी :मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य मु ंबई,मा. ना. मुख्यमंत्री साहेब, महाराष्ट्र राज्य मुंबई, मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड यांना देण्यात आले.या निवेदनावर पुढील प्रमाणे सह्या आहेत.छगनराव मुळे, प.स.सभापती अनिल जायभाय,समता परिषदेचे तालुकाध्यक्ष दिगंबर नाईकनवरे,माजी सरपंच आनंद राऊत,सुर्वसे पाचंग्री, विनोद राऊत, माजी सरपंच हनुमान शेलार, सभापती रामश्वर गोरे, गणेश खाड ॑ (माजी सैनिक )संपत नागरगोजे,शेलार कृष्णा, सुदर्शन गोरे, गणेश शेवाळे,सानप गणेश,काळुशे पियुस,आबा गर्जे, संतोष नाईकनवरे, खंडागळे विष्णू, विक्रम राऊत, श्रीधर राऊत, नाईकनवरे दत्तोबा, अंकुश अशोक, आदींच्या सह्या आहेत

# उपसा जलसिंचन योजनांना पुढील दोन वर्षांसाठी वीज बिलात सवलत शेतकऱ्यांना मोठा दिलासा

शेतकऱ्यांसाठीच्या अतिउच्चदाब, उच्चदाब आणि लघुदाब उपसा जलसिंचन योजनेसाठीच्या वीजदर सवलत योजनेस आणखी दोन वर्षांसाठी म्हणजेच मार्च, २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे राज्यातील सुमारे १ हजार ७८९ उपसा सिंचन योजनांच्या खर्चात मोठी बचत होण्याबरोबरच त्याचा थेट फायदा या उपसा सिंचन योजनांशी निगडीत शेतकऱ्यांना होणार आहे. या वीजदर सवलत योजनेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना पिकांसाठी पाणी उपलब्ध करणे सुलभ झाले आहे. यातून शेतीचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. त्यामुळे यापुर्वी जाहीर केलेली ही वीजदर सवलत योजना शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यात आणि त्यांच्या कृषि उत्पन्नात वाढ करण्यात सहायभूत ठरली आहे. त्यामुळेच या कल्याणकारी योजनेस ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेत अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकासाठींचा सवलतीचा वीजदर प्रति युनीट रुपये १.१६ रुपये आणि स्थिर आकार दरमहा २५ रुपये रुपये (प्रति के.व्ही.ए.) आणि लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकासाठींचा सवलतीचा वीजदर प्रति युनिट एक रुपया आणि स्थिर आकार दरमहा रुपये १५ रुपये (प्रति अश्वशक्ती) अशी सवलत ३१ मार्च, २०२७ पर्यंत कायम ठेवण्यास मान्यता देण्यात आली. या सवलतीमुळे महावितरणला महसुली तुटीच्या भरपाईकरिता राज्य शासनाकडून २०२५-२६ या वार्षिक वर्षात ८८६ कोटी १५ लाख रुपये आणि २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ८७२ कोटी २३ लाख रुपये देण्यास मान्यता

# डॉ.सुरेश साबळे सर यांची माजलगाव ग्रामीण रुग्णालय येथे अधीक्षक म्हणून निवड - सर्व समाज बांधवांसाठी अभिमानाची गोष्ट

माजलगाव - आरोग्य सेवा ही केवळ व्यवसाय नाही, ती एक समाजधर्म आहे, याचा आदर्श ठरलेले डॉ. सुरेश साबळे यांची नुकतीच माजलगाव ग्रामीण रुग्णालय येथे अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन करताना संपूर्ण परिसर आनंदित झाला आहे.

डॉ. साबळे सर यांनी वैद्यकीय क्षेत्रात प्रदीर्घ सेवा करताना गरजू आणि दुर्बल घटकांसाठी निःस्वार्थ काम केले आहे. रुग्णालयातील सुविधांची कमतरता असो किंवा औषधांचा तुटवडा, त्यांनी आपल्या अनुभवाचा आणि समर्पणाचा उपयोग करून अनेक रुग्णांचे उपचार केले, त्यांच्या अडचणी समजून घेत त्या सोडवण्याचा प्रयत्न केला. अनेक वेळा त्यांनी वैयक्तिक वेळ व संसाधने खर्चून रुग्णांना मदतीचा हात दिला, यामुळे त्यांच्याविषयी लोकांच्या मनात सखोल आदर निर्माण झाला आहे.

ग्रामीण भागात आरोग्य सेवांची अडचण अधिक जाणवत असते. अशा परिस्थितीत डॉ.



साबळे यांनी विविध लसीकरण मोहिमा, आरोग्य तपासणी शिबिरे, गर्भवती माता आणि बालकांसाठी विशेष सेवा, आणि रोगप्रतिबंधक उपाय यांसारख्या उपक्रमांद्वारे लोकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक रुग्णांनी वेळेवर उपचार मिळवले आणि जीवन नव्याने मिळवलं.

त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले की, ते प्रत्येक रुग्णाशी जिव्हाळ्याने संवाद साधतात. उपचार केवळ औषधापुरते न राहता मानसिक आधार आणि सुसंवाद यालाही ते तितकेच महत्त्व देतात.अशा सेवाभावी वृत्तीमुळे त्यांची ओळख फक्त एक डॉक्टर म्हणून नाही, तर समाजहितासाठी झटणारा सेवक म्हणून झाली आहे.

माजलगाव ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षकपदी त्यांची नियुक्ती ही त्या संस्थेसाठी तसेच परिसरासाठी मोठा टप्पा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली रुग्णालयात आधुनिक उपचारपद्धतींचा अवलंब, रुग्णसेवेतील सुधारणा आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण या दिशेने सकारात्मक बदल घडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

डॉ. सुरेश साबळे सर यांच्या पुढील कार्यासाठी आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. त्यांच्या कार्याने आरोग्य सेवा अधिक सक्षम होईल, आणि अनेक गरजू रुग्णांना योग्य उपचार व आधार मिळेल, अशी आम्हाला खात्री आहे. त्यांच्या सेवेला आणि नेतृत्वाला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

डॉ. साबळे सर यांचे मनः पूर्वक अभिनंदन आणि उज्ज्वल भविष्याच्या शुभेच्छा!

**शब्दांकन**
**लक्ष्मण काठवडे**

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार ११ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# महाराष्ट्रात 17 जिल्ह्यांना हाय अलर्ट, गरज असेल तरच घराबाहेर पडा, पावसाचा पुन्हा मोठा इशारा

यंदाच्या हंगामामध्ये देशभरात पावसाचं प्रमाण चांगलं राहिलं आहे. अनेक राज्यांमध्ये तर पूर परिस्थितीचा सामना करावा लागला, याचा सर्वात मोठा फटका हा पंजाबला बसला आहे, पुरामध्ये पंजाबचं मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान आता पुन्हा एकदा हवामान विभागाकडून (IMD) देशभरात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पुढील सात दिवस 11 सप्टेंबर ते 16 सप्टेंबरदरम्यान अनेक राज्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता (Heavy Rain Alert) आहे. भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पुढील सात दिवस उत्तर पश्चिम भारतामध्ये पावसाची शक्यता आहे. राजस्थान आणि दिल्लीमध्ये काही भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे तर दुसरीकडे उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, जम्मू -काश्मीर, पंजाब आणि हरियाणा या राज्यांमध्ये मध्यम स्वरुपाच्या पवासाचा अलर्ट देण्यात आला आहे. या काळात या राज्यांमध्ये वाऱ्याचा वेग प्रति तास 30-40 किमी एवढा राहण्याची शक्यता आहे. दुसरीकडे उत्तरपूर्व भारतामध्ये देखील हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात




आला आहे, उत्तरपूर्व भारतामध्ये पुढील सात दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार मेघालय, मणिपूर, मिझोरम, अरुणाचल प्रदेश, त्रिपुरा आणि नागालँडमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. पश्चिम भारतामध्येही पावसाचा इशारा देण्यात आला असून, महाराष्ट्र आणि गोव्यामध्ये पुढील सात दिवस वादळी वारा, विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाची शक्यता आहे. दक्षिण भारतामधील राज्यांना देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

### महाराष्ट्रात काय स्थिती?

हवामान विभागाकडून महाराष्ट्राला 17 सप्टेंबरपर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, महाराष्ट्रातील 17 जिल्ह्यांमध्ये पुढील सात दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, ज्यामध्ये मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग यांसह रायगड, कोल्हापूर, सांगली, सातारा, अहमदनगर, लातूर, नांदेड, बीड, परभणी, हिंगोली आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा समावेश आहे, या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून महाराष्ट्राला हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# संपादक राजेंद्र होळकर यांना पत्नीशोक सुहासिनी होळकर कालवश

बीड। प्रतिनिधी अभिमान परिवाराचा आधार असलेल्या संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर (वय ५४) यांचे उपचारा दरम्यान पुणे येथे बुधवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पुणे येथेच अंत्यसंस्कार करण्यात आले. सुहासिनी होळकर यांच्या निधनाने अभिमान परिवाराचा मोठा आधार कोसळला आहे.अभिमानचे संपादक राजेंद्र होळकर यांच्या पत्नी सुहासिनी होळकर मागच्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर पुणे येथील रूग्णालयात उपचार सुरू होते. तब्बल १ महिन्याहून अधिक काळ त्यांनी आजाराशी कडवी झुंज दिली. मात्र बुधवारी पहाटे उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.सुहासिनी होळकर यांनी अत्यंत जिद्दीने आणि संघर्षाने जीवन जगले होते, अभिमान परिवार मोठा करण्यात संपादक राजेंद्र होळकर यांना त्यांनी कायम खंबीरसाथ दिली होती. एक संवेदनशील



व्यक्ती, कर्तव्यदक्ष गृहीणी, कर्तव्यकठोर माता अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडत त्यांनी आयुष्य जगले. मागच्या काही काळात त्या आजारी असतानाही त्यांनी जिद्द सोडली नव्हती. अभिमानच्या वाटचालीत संपादक राजेंद्र होळकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका त्या कायम घेत आल्या होत्या. बुधवारी त्यांची प्राणज्योत मालवली. बुधवारी दुपारी पुणे येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी होळकर कुटूंबासोबतच अभिमान परिवारावर प्रेम करणार्या अनेकांची उपस्थिती होती. सुहासिनी होळकर यांच्या निधनाचे वृत्त कळताच जिल्हाभरातून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी राजेंद्र होळकर यांचे फोनवर सांत्वन केले. सुहासिनी होळकर यांच्या पश्चात पती राजेंद्र होळकर, मुलगा डॉ. साहिल असा परिवार आहे.

## संपादक जितेंद्र सिरसाट यांना पितृशोक!

### कान्होजी लिंबाजी सिरसाट यांचे वृद्धापकाळाने दु:खद निधन



बीड दि.१०(प्रतिनिधी)- संपादक जितेंद्र सिरसाट यांचे वडील कान्होजी लिंबाजी सिरसाट यांचे बुधवार दिनांक १० रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ८१ वर्ष होते. बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील मूळ रहिवासी व सध्या संत नामदेव नगर भागात रहिवासी असलेले सायं. दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांचे वडील कान्होजी लिंबाजी सिरसाट हे अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांना पिंपळनेर आणि बीड परिसरात 'दादा' या नावाने ओळखले जात होते. ते महावितरण मध्ये सेवा करून सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्यावर फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. बुधवार दिनांक १० रोजी दररोजच्या प्रमाणे घरी आराम करत असताना अचानक रात्री ९ वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने त्यांची प्राणज्योत मालवली. निधनासमयी त्यांचे वय ८१ वर्ष होते. आज गुरुवार दिनांक ११ रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास भगवान बाबा प्रतिष्ठानच्या मागे असलेल्या स्मशान भूमीत अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, तीन मुली, जावाई नातू पणतू असा मोठा परिवार आहे.सिरसाट परिवाराच्या दुःखात दै _____ परिवार सहभागी आहे.



बीड - मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांची मु ंबई येथील आंदोलनानंतर गॅलेक्सी हॉस्पिटल संभाजीनगर येथून सुट्टी झाल्यानंतर शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब यांनी भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली व पुढील कार्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने व मु ंबई येथील शिवसैनिकांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा दिल्या यावेळी शिवसेना बीड जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्या सह मु ंबई येथून आलेले आंदोलनादरम्यान काम करणारे मराठा सेवक समीर जाधव,नागेश पवार,धर्मेश सकपाळ यांच्या सह मु ंबई आंदोलनादरम्यान मराठा सेवक म्हणून कार्य केलेले कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या नविन जोडणीमुळे बीडकरांचा पाण्याचा प्रश्न सुटणार–आ.संदीप क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी):- बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या २२० के.व्ही. नाळवंडी या लाईनवरून ३३/११ के. व्ही. म्हाळसजवळा फिडरला जोडून ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विद्युत फिडरला नविन जोडणीच्या कामाचा शुभारंभ संपन्न झाला.बीड विधानसभेचे आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते बीड शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाच्या विद्युत फिडरला जवळा येथील सबस्टेशन म



धून विद्युत प्रवाह वाहीनीच्या नविन जोडणीच्या कामाचा शुभारंभ संपन्न झाला. सदर लाईन जोडल्यामुळे २४ तास लाईट जल शुद्धीकरण केंद्रला उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे बीड शहराला अखंडित पाणी पुरवठा होणार असून बीड शहरातील नागरिकांचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी ईट येथील जलशुद्धीकरण प्रकल्पावर भेट देऊन दुरुस्तीचे कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. बीड शहरासाठी नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून, त्यासाठी माजलगाव धरणातून पाणी आणण्याचा विचार देखील केला जात आहे.

# भारत आता युरोपची नांगी ठेचणार, 'या' दोन देशांच्या मदतीने टाकणार मोठा डाव

युरोपियन देश आणि युरोपियन यूनियन नेहमीच भारतासाठी डोकेदुखी ठरले आहेत. युरोपकडून अनेक छोट्या-छोट्या गोष्टींवर नियम लावले जात आहे. मात्र आता भारताने युरोपला धडा शिकवण्याची तयारी सुरू आहे. ब्राझील, भारत आणि दक्षिण आफ्रिका हे देश आता एक नवीन आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करणार आहेत. या व्यासपीठावर हवामान धोरण आणि व्यापार यावर चर्चा केली जाणार आहे. युरोपियन युनियन जंगलतोड आणि कार्बन टॅक्स या कठोर धोरणांची अंमलबजावणी करत आहे. याचा फटका भारतासारख्या विकसनशील देशांच्या व्यापाराला बसत आहे. त्यामुळे आता भारत आणि सहकारी देश एक नवीन व्यासपीठ तयार करणार आहेत ब्राझील नोव्हेंबरमध्ये COP30 हवामान परिषदेचे आयोजन करणार आहे. यावेळी जागतिक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावर या नवीन व्यासपीठ तयार करण्याचा प्रस्ताव सादर केला जाणार आहे. हवामान बदलाच्या बहाण्याने व्यापार थांबवण्याच्या युरोपच्या प्रयत्नाला उत्तर देण्यासाठी या व्यासपीठाची स्थापना केली जाणार आहे. ब्राझीलच्या मते, WTO किंवा UN हे हवामानाबाबत चर्चा करण्यासाठी योग्य व्यासपीठ नाही. आगामी काळात नवीन व्यासपीठ तयार केले जाईल आणि मालाचे उत्पादक आणि खरेदीदार यांच्यासाठी सोपे आणि व्यावहारिक उपाय शोधेल. याचा मोठा फायदा व्यापाऱ्यांना होणार आहे. भारतासाठी हे व्यायपीठ का महत्त्वाचे आहे?



भारत आणि इतर देशांवर युरोपियन धोरणांचा थेट परिणाम होतो. कारण भारतातून युरोपला मोठ्या प्रमाणात स्टील, सिमेंट, कॉफी, कोको आणि सोयाबीनची निर्यात केली जाते. युरोप आता काही नवीन कायदे लागू करणार आहे. त्यामुळे कर वाढण्याची शक्यता आहे. या थेट परिणाम व्यापारावर होणार आहे. भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर अनेक वेळा हवामान बदलाशी लढण्याबाबत भाष्य केले आहे. मात्र हवामान बदलाच्या नावाखाली व्यापारात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न युरोपकडून होत आहे. त्यामुळे भारत ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या देशांसाठी नवीन व्यासपीठ फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.

युरोपचं म्हणणं काय आहे?
युरोपियन युनियन असं म्हणत आहे की, कार्बन टॅक्स हा व्यापारात अडथळा नाही. युरोपियन उद्योग कार्बन उत्सर्जनासाठी मोठी फी भरत आहेत, त्यामुळे परदेशी कंपन्यांनीही अशी फी भरावी असं युरोपचे म्हणणे आहे. मात्र विकसनशील देश असं म्हणत आहेत की, युरोपचा खरा हेतू हा कार्बन टॅक्सच्या माध्यमातून युरोपच्या बाजारपेठेचे संरक्षण करणे हा आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com